Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे

# मैत्री : नवरा बायकोतील

श्रीनिवास हेमाडे 9226563052



'मैत्री' ही आपल्या जगण्यातील महत्वाचा व अनिवार्य हिस्सा आहे.लग्नासारखेच ते आतून खासगी पण बाहेरुन सार्वजनिक स्वरुपाचे नाते असते.ते एक नैतिकदृष्ट्या चांगले,चिरेबंदी आणि चिरस्थायी सामाजिक नाते असावे,अशी सर्वांची उत्कट इच्छा असते.मनाला भावनिक अन्न पुरविणारी ती सामाजिक संस्था आहे.त्यामुळे तिला नीतीशास्त्रीय मूल्याबरोबरच आत्मगत सौंदर्यशास्त्रीय मूल्यही असते.

मैत्री ही ज्ञान,तर्क, प्रेम,सौंदर्य, ईश्वर,आत्मा,मन,धर्म,संगीत यासारखी एक संकल्पना आहे .ती आपल्या सामाजिकीकरणात अतिशय मोलाची भूमिका बजावते.श्वासोच्छवास जितका सहज व्हावा तितकीच ही संकल्पना आपल्या व्यक्तीत्वात व जीवन व्यवहारात मुरलेली आहे.

मैत्री मानवी जीवनाचा जणू काही गाभा असते.पण प्रत्यक्ष व्यवहारात मैत्री हे मूल्य फारसे जपले जात नाही.'बटन लावण्यासाठी सुई कुठे ठेवावी ' म्हणजे ती लगेच सापडेल असा किंवा " टिकावू झाडू म्हणजे कसा झाडू ? " हा विचार जितका केला जातो तेवढा सुध्दा मैत्रीचा विचार केला जात नाही.अर्थात रोमॅण्टकि प्रेमाचाही विचार केला जातोच असे नाही. मैत्रीची तुलना पैसा,भाषा,प्रदेश,देश अथवा प्रेम यांच्याशी केली जाते.तिची व्याख्याच करण्याची वेळ आली तर ती कोणत्यातरी भौतिक वस्तू, गरज इ. शीच जोडलेली आढळते. जीवनाच्या महत्त्वाच्या एका अंगाकडे आपण इतके कमी लक्ष देतो, ही शोकांतिका आहे.

या शोकांतिकेच्या तणावात जागतिकीकरणामुळे भर पडली आहे.जागतिकीकरण समाजात काही प्रमाणात काही स्तरांवर समृध्दी आणण्यात यशस्वी ठरले तरी नातेसंबंधात खंकपणाही आला.तिच्या विळख्यात ' मैत्री ' ही संकल्पना सुध्दा सापडून ती उपयुक्ततावादी, बाजारू, दिखावू बनावटीची झाली अथवा ते पोकळ,कसलीही जबाबदारी न घेणारे नाते,कोणत्याही नव्या नात्याची निर्मिती करण्याची क्षमताही नसलेले क्लिब नाते बनले,असेही म्हणण्यास वाव आहे.' फ्रेंडशिप डे, व्हॅलेंटाईन डे ' साजरे होण्यामागे मैत्रीचे सेतू किती बांधले जातात आणि धंदा किती जोखला जातो, हा गंभीर संशोधनाचा विषय आहे. या लेखात मित्र या शब्दाचा उल्लेख प्रथम पुरुषी एकवचनी करीत आहे ते केवळ सोयीसाठी .त्याच अर्थ तो आणि ती असा दोन्ही समजावा.( He includes She या शब्दार्थाने पण त्या न्यायाने नव्हे.)

## मित्र म्हणजे नेमका कोण ?

मैत्री जोडण्यासाठी तीन 'सामाजिक कृती' (social actions) कराव्या लागतात :

(1) कुणीतरी आपले होण्यासाठी आपणास ' काय ' करावे लागेल ?

(2) आपण स्वत: इतरांचे मित्र होण्यासाठी ' आपणास ' काय काय करावे लागेल ?

(3) आपण मित्र व्हावे,असे ज्यांना वाटते त्या (एका अर्थाने भावी ) कुणीतरी मित्रांनी ' काय ' केले पाहिजे ?

या प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे 'मित्र असणे म्हणजे नेमके काय व कसे असणे ?' हे समजावून घेणे . एखाद्याविषयीच्या आपल्या मैत्र भावनेचे वर्णन " त्याच्या भल्यासाठी आणि त्याच्यासाठी जे श्रेयस्कर आहे ( जे प्रिय आहे ते नव्हे ) तेच त्याला प्राप्त व्हावे " अशी सदिच्छा बाळगणे, असे करावे लागेल . ते त्याच्या करण्याची तुमची वृत्ती असली पाहिजे आणि ती यथार्थतेने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी प्रकट करणे ,

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



म्हणजे मित्रभाव असणे. ही कीतीशील सदिच्छा तुम्ही अनुभवली पाहिजे आणि केवळ आपण त्या अनुभावयाच्या असे नव्हे तर दुसऱ्या व्यक्तीमध्ये सुध्दा तुम्ही त्या भावना जागविल्या पाहिजेत.

ही किमान अपेक्षा आहे.ती मान्य झाली की, पुढचे काम सोपे होते. 'तुमचा' मित्र ही अशी व्यक्ती असते की तुमच्या इष्ट गोष्टी प्राप्तीच्या तुमच्या आनंदात आणि सर्व तऱ्हेच्या दु:खातही सहभागी असते.तुमच्यासंबंधीच्या सहभागित्वाची तिची भावना हीच ती तुमचा मित्र असण्याची बलशाली खूण असते. या मूलभूत अटीचे आपण आणखी थोडे विश्लेषण करु. उदाहरणार्थ,-

**1. सदिच्छा :** तुम्ही मित्राचे हित चिंतिता, याचा अर्थ तुम्ही त्यासाठी श्रेयस्कर असलेल्याच गोष्टीची इच्छा करता.

**2. प्रतिसाद :** तुमच्या या सदिच्छेला त्या मित्राकडून अगदी असाच प्रतिसाद मिळतो.म्हणजेच ती व्यक्तीसुध्दा तुमचे हितच चिंतते. (''मी तिचा मित्र आहे पण ती माझी मैत्रीण नाही '' किंवा '' तो माझी मैत्रीण आहे पण मी तिचा मित्र नाही '' असे किंवा इतर कसेही , काहीही म्हणणे किती विचित्र होईल ते पाहा )

**3. सत्संकल्प :** '' मित्राचे चांगले व्हावे '' अशी केवळ इच्छा पुरेशी नव्हे तर ती इच्छा तुमच्या वर्तनात अगदी ठळकपणे जाणवेल, असा बदल तुमच्यात झालेला असला पाहिजे.

**4. निस्वार्थता :** मित्राचे चांगले होण्याच्या तुमच्या इच्छेत तुमचा स्वार्थ असेल तर तुम्ही मित्राचे सच्चे मित्र असू शकत नाही.

**5. उभयपक्षी सदिच्छा :** 'मित्राचे भले व्हावे ' हे उद्दिष्ट दोन्ही मित्रांनी एकमेकांसाठी नि:स्वार्थपणे मान्य केले पाहिजे व तसे वागले पाहिजे.ही उभयपक्षी सदिच्छा.

या साऱ्या अटी आपल्या सख्ख्या, थेट मित्राबाबत पाळल्या गेल्या पाहिजेतच पण ज्यांचा परिचय झालेला नाही अशीही मित्रांबाबतही त्या पाळल्या पाहिजेत. म्हणजे नेमके काय ?

समजा : तुमच्या जिवलग मित्राचा असाच जिवलग मित्र आहे, ज्याची व तुमची अद्यापि भेट झालेली नाही.तुमचा मित्र त्याच्या त्या मित्राबाबत तुम्हाला नेहमीच सांगत असतो.त्या मित्राच्या यशापशाच्या सर्व बातम्या तुम्हाला तो सतत देत असतो.आणि तुमच्याबाबतचीही सगळी माहिती तुमच्या या मित्राने त्याच्या त्या मित्राला दिली आहे.म्हणजेच त्यालाही तुमच्याबाबतची सगळी माहिती आहे. अशा रितीने वरील पाचही अटी पूर्ण होत असल्याने तुम्ही एकमेकांचे मित्र आहात.पण एकदाही भेटलेला नाहीत.

पण आता तुम्ही खरेच मित्र आहात का ?

नाही.

कारण, तुमच्या जिवलग मित्राने तुम्हा दोघा मित्रांना एकमेकांच्या सदीच्छांची जाणीवही करुन दिली असल्याने मैत्रीची पाचवी अट पूर्ण होते पण तरीही काही तरी शिल्लक राहिल. म्हणून तुम्ही एकमेकांना केंवळ शब्दाने ओळखणारे पण न भेटलेले 'अनोळखी' लोक 'मित्र' होण्यासाठी आणखी काही घटकांची आवश्यकता आहे.

तो म्हणजे सहभागीत्व. ही सहावी अट.

**6.सहभाग:** तुम्ही दोघांनीही एकमेकांचे जीवन 'शेअर' केले पाहिजे.सहभाग दिला पाहिजे. याचा अर्थ मित्राने केवळ सदिच्छा व्यक्त करावयाची नसते तर एकमेकांना सहभाग रुपाने आंतरक्रियाही दिली पाहिजे.या सहाव्या अटीतून सातवी अट निष्पन्न होते ती म्हणजे, -

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे

**7.सहजीवन :** हा सहभाग देणे कसे शक्य होईल ? तर त्यासाठी एकमेकांना भेटले पाहिजे.पण कधीतरी न भेटता सातत्याने भेटत राहिले पाहिजे.हेच सहजीवन !

सहजीवनात या अटी पूर्ण होत असल्या तरच *सहजीवन* यथार्थ होते.खरे म्हणजे सहजीवन याचा अर्थ तोच आहे .या मित्रांनी केवळ कागदोपत्री अथवा मानसिक सत्संकल्प न करता तो प्रत्यक्षात आणण्यासाठी सहजीवनाचा अनुभव घेतला पाहिजे. *'सहजीवनाचा प्रत्यक्ष अनुभव'* हीच मैत्रीची मूलभूत व्यापक अट आहे.ती पूर्ण करणे म्हणजे प्रत्यक्षात पहिली अट पूर्ण करणे. सातवी अट व पहिली अट समसमान आहे.



आता, मित्र व मैत्री ही संकल्पना स्पष्ट झाली की कुणाशी ती करावी ? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.त्यासाठी 'मैत्रीचे प्रकार' ही समजावून घेतले पाहिजेत.त्यातूनच मित्राचे ही प्रकार तर आपसूकपणे समजतील पण 'मैत्री' या संकल्पनेचे आणखी स्पष्टीकरण होईल.

## मैत्रीचे प्रकार :

विविध लोकांबद्दल आपणास जे ममत्व, आपुलकी किंवा मैत्री वाटते, त्यामागे साधारणत: तीन हेतू सांगता येतील. एक तर ती माणसे आपणास आनंददायक वाटतात. किंवा ती उपयुक्त असतात. अथवा ती खरोखरच चांगली असतात.या आधारावरच मैत्रीचे तीन प्रकार करता येतील.

1. आनंददायी मैत्री (Pleasure Friendship)
2. उपयोगी मैत्री (Utility / Use Friendship )
3. चरित्र मैत्री (Character Friendship)

एखादया व्यक्तीकडे प्रचंड विनोदबुध्दी असेल,तुम्हाला ती विविध प्रकारच्या कथा, विनोद सांगून आनंद देत असेल,हसवित असेल, तर तिच्याशी मैत्री ती 'आनंददायी मैत्री' होय.वास्तवात कदाचित ती व्यक्ति एक अत्यंत टुकार इसमी (अथवा इसमीण) असू शकते (असेलच असे नाही.) दुसऱ्या प्रकारामध्ये धंदा, व्यवसाय, नोकरी, तात्पुरते एकत्र येणे, इत्यादीतील तुमच्या सहकाऱ्याशी असलेली मैत्री किंवा अगदी ज्यांच्याबरोबर तुम्ही अभ्यास करता,अशी वर्गाबाहेरील व्यक्ती,शेजारी,विशिष्ट कारणासाठी एकत्र येणारा ग्रुप,प्रवासातील ओळखी यांचाही समावेश होतो.किरकोळ मदतीपासून ते मोठ्या राजकीय,आर्थिक मदतीपर्यंत कोणत्याही प्रकारची मदत करणे याच निकषावर ही मैत्री टिकलेली असते.ही 'उपयुक्ततावादी मैत्री ' होय.

आता, या दोन्ही मैत्री प्रकारांमध्ये एक रहस्य आहे. या रहस्यामुळे एक नैतिक ताणही निर्माण होतो. ते रहस्य असे की , तुमची मैत्री या मित्रांबरोबर, त्या व्यक्तींबरोबर नसते तर त्या व्यक्तीच्या *उपयोगी पडणाऱ्या गुणांबरोबर* असते. किंवा तुमचा मित्र सुध्दा त्याला उपयोगी असलेल्या तुमच्यातील गुणांशीच मैत्री करीत असतो.उपयुक्ततेची व्यापकता एखादा पी.जे.मारून आनंद देण्यापासून ते ॲरिस्टॉटलचे किंवा कुणाचेही विचार समजावून देणे,इथपर्यंत असू शकते.वास्तवात तो तुम्हाला समग्र व्यक्विवत्वाने आवडतही नसेल.फक्त त्याचा एखादाच गुणधर्मच आवडतो बस ! तोही केवळ तुम्हालाच आवडणारा गुणधर्म. व्यक्तिनिष्ठ खासगी आवड !

नैतिक ताण निर्माण होतो तो असा की पहिल्या दोन प्रकारातील मित्र सुध्दा आपल्या मित्रांचे भले व्हावे अशी इच्छा करतात, हे खरे. पण त्यांची ही इच्छा निरपेक्ष, नि:स्वार्थ नसते.ती त्यांच्या स्वार्थाशी जोडलेली असते. स्वार्थ साधला जात असेल तर आणि तरच मित्राचे चांगले व्हावे अशी ते इच्छा करतात आणि तसे होणार नसेल तर ते इच्छा करीत नाहीत. "आपण मित्र का आहोत ?" याचे स्वच्छ भान दोघांना असतेही ! ज्याक्षणी उभयबाजूंनी ही उपयुक्तता संपेल त्याक्षणी मैत्री सुध्दा संपेल. या उलट चरित्र मैत्रीमध्ये तुम्हाला खुद्द 'तो मित्रच

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



आवडतो ’.त्याचे विशिष्टच गुणधर्म किंवा त्याचे तुम्हाला उपयोग पडणे हे दुय्यम असते.प्राथम्य असते ते नैतिक दृष्टीकोनातून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व, चरित्र तुम्हाला आवडणे.ती व्यक्ती नीतिमान आहे,जिचा आदर्श घ्यावा अशा खऱ्या सदिच्छेने ती वागते.हे नैतिक वर्तनच हा तुमच्या मित्र असण्याचा मजबूत धागा असतो.हा तुमचा मित्र निरपेक्ष नितळ पारदर्शी मित्र असतो ! हा सन्मित्र, चरित्रमित्र होय !! अशा अनेक मित्रांचा समूह असेल.कदाचित केवल दोघांचाही असेल.आता तुम्ही सच्च्या मित्रत्वाच्या समाधीत आहात .

चरित्रमित्र हाच अस्सल,चोख मित्र असतो.तो त्याच्या सर्व मित्रांचे भले चाहतो,त्यासाठी प्रयत्न करतो.त्यांच्या यशाने आनंदी होतो,अपयशाने दु:खी होतो.तो मित्र तोडू इच्छित नाही.कारण त्याचे मित्र हे केवळ मित्र नसतात,तर ते त्याच्या अस्तित्वाचेच भाग असतात, त्याच्या अस्तित्वाचा विस्तार असतात.

हा *आपला मित्र आणि आपण* सर्वजण मिळून *एक समग्र* अस्तित्व बनते. जणूकाही ती स्वतंत्र स्वायत्त ‘सेंद्रीय एकता ’ असते ! ते एकच एक अस्तित्व असते.जणू अद्वैतच. Best Friends ! मैत्री इतकी उदात्त असेल तर आपण सगळयांशी मैत्री करावी का ? आपले किती Best Friends असावेत?

या प्रश्नात पुन्हा एक नैतिक ताण आहे.आपल्या अतिशय जवळच्या आणि बेस्ट असलेल्या मित्रांमध्ये सुध्दा आपल्याला काही गोष्टी राखीव ठेवाव्या लागतात.आपल्या स्वभावातच काही गोष्टी अशा असतात की, सभ्यतेच्या मर्यादांमुळे आपणांस त्या लपवाव्या लागतात.आपल्याला त्या माहित असतात.पण त्या Best Friends पासून सुध्दा लपवितो.लपविल्या पाहिजेत .ज्याच्यापासून काहीतरी लपवावे लागत` तो मग Best Friend आपला Best Friend कसा राहिल ? Best चं सोडा पण तो साधाही Friend राहात नाही. मग हा ताण सोडवावा कसा ? मुळात हा ताण का , कसा येतो ?

याचे कारण आपल्या मनाचे विविध कल, भावना आपणास सर्व काही उघड करु देत नाहीत.त्या प्रत्येकाच्या संदर्भात एखादीच व्यक्ती आपली उत्तम मित्र असू शकते,दुसरी असेलच असे नाही.दुसरी ज्या संदर्भात आपली मित्र असेल तशी तिसरी नसेल.असे नेहमी घडते.त्यामुळेच तर आपले एकापेक्षा जास्त चांगले मित्र असले पाहिजेत.एकाजवळ आपण एक गोष्ट बोलू तर दुसऱ्याजवळ दुसरी बोलू आणि तिसऱ्याजवळ मनाचा वेगळाच कप्पा खुला करु शकू.असे करावे लागते.का ? त्याचे कारण आपल्या जीवनाचेच अनेक कप्प्यांमध्ये विभागणकिरण झालेले असते.असे कप्पीकरण अपरिहार्यरित्या होते.म्हणून अनेक Best Friends असावेत. पण हे ही तापदायकच आहे की ! मग काय ? याचे खरे उत्तर असे की “आपल्या मनाचे सर्व कप्पे ज्याच्याजवळ उघडे करु शकतो तोच आपला खरा मित्र असतो.अनेक Best Friends मध्ये आपणांस अपेक्षित असलेल्या अनेक व्यक्तीमत्वांचे एकत्रिकरणच या सन्मित्रात झालेले असते.

पण असा Best Friends खराच वास्तवात / अस्तित्वात असू शकतो का ? आपल्याला लाभू शकतो का ? शक्यता फारच कमी आहे. म्हणून तर सॉक्रेटिस एकदा असे म्हणाला की, ‘ My Dear Friend, there are no friends !’’

येथे सॉक्रेटीसला काय सांगायचे आहे ? तर मैत्रीची संकल्पना परिपूर्णरित्या अविष्कृत करणारी मैत्री अद्यापि अस्तित्वातच आलेली नाही.तरीही ‘मैत्री’ ही संकल्पना खरी आहे.कारण आपला Best Friend चा शोध जारी असतो .

मित्राची गरज का असते ? आपल्याला मैत्रीची गरज का आहे ? आपणास मैत्री का करावीशी वाटते ? कारण “आपण स्वत:ला मोकळे करावे” अशी एक जबरदस्त इच्छा आपल्या मनाला असते .ती व्यक्त करण्यासाठी आपल्याला ज्या व्यक्तीची गरज असते तो मित्र ! ज्याच्याजवळ आपले मन मोकळे करु शकतो,

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



ज्याच्या खांदयावर विश्वासाने मान ठेवू शकतो, ज्याच्यापासून काही लपवावे , असे आपणास वाटत नाही,असा एक तरी मित्र आपणास हवा असतो.म्हणून तर सगळया खुल्या अंत:करणाने आपण स्वत:ला मैत्रीत झोकून दिले पाहिजे. आणि असे स्वत:ला मोकळे करणे म्हणजे आपल्या विचारांची दुरुस्ती करण्याची संधी निर्माण करणे असते.अशा मित्राचे आपल्या आयुष्यात असणे हे माणसांचे श्रेयस आहे.त्या मित्राद्वारेच आपले अस्तित्व आपण यथार्थतेने ,समग्रतेने आणि आनंदाने उपभोगू शकतो.

सुखी,अतिशय चांगला,आनंदी माणसालाही मित्रांची गरज असते.अशा व्यक्तीची श्रीमंती, सुख टिकवून राहावे, ते वाढावे असा संकल्प व कृती कोणतीही अनोळखी व्यक्ती नाही तर मित्रच तसा संकल्प करतो आणि प्रयत्न करतो.म्हणूनच मित्राची गरज प्रत्येकास असते.मग ती व्यक्ती कुणीही असो. फक्त जनावर आणि ईश्वर या दोघांनाच मित्राची गरज नसते.

## मैत्रीचे घटक

वरील चर्चेमधून मैत्रीचे चार घटक हाती येतात . ते असे :

**(अ)निखळ आनंद** : न बोलता सुध्दा मित्राच्या केवळ जवळ असण्याने एक निवांत आनंद मिळतो.जसे आई तिच्या कामात गुंग असली , बोलत नसली तरी बालकाला तिच्या केवळ जवळपास असण्याने समाधानी ,सुरक्षित वाटते.तसे मित्राच्या सान्निध्यात वाटते.

**(ब) मदतनीस** : भौतिक स्वरुपाची मदत करण्याबरोबरच मित्र आपल्या नैतिक धारणा विकसित होण्यासाटी मदत करतो.

**(क) आत्मप्रकटीकरण** : स्वत:ला मोकळे करणे : मित्राकडे आपण अनेक व्यक्तिगत बाबी खुल्या करुन मन मोकळे करतो.

**(ड) समजूतदारपणा** : मनमोकळे करण्याचा अर्थ एखादी चूक आपण का केली ? हे मित्राने समजून घ्यावे,त्यात दुरुस्ती करावी ही अपेक्षा.

ज्या मित्राबरोबर आपण वेळ घालवितो तो वेगवेगळ्या प्रकारे ओळखत असल्याने त्या गरजेनुसार मदत करतो.या प्रक्रियेत आपण त्याच्याजवळ अंत:करण मोकळे करतो.याचा अर्थ असा की सतत त्याच्याबरोबर राहिल्याने आपण एखादी चूक का केली, हे तो समजावून घेवू शकतो.म्हणजेच आपल्या नैतिक धारणांचे स्खलन होणार नाही,असे तो पाहतो,त्या जपण्याचे काम करतो.हाच नैतिक विकास. त्यामागे दोन गृहीततत्त्वे आहेत : **एक** - माणूस चूक करीत असतो.**दोन** - त्या चुकीची चांगली - वाईट स्पष्टीकरणे आणि विशेषत: चुकीचे समर्थन देवू शकतो.त्यातूनच त्याच्या नैतिक स्खलनाची शक्यता वाढते.तसे होवू नये यासाठीच मित्राची गरज असते.

## मैत्रीचे स्वरुप

थोडक्यात , ' मैत्री हे भाषेशी शाब्दीक खेळ करणाऱ्या नीतीवाद्यांच्या मते एक प्रकारचा पांढरा घोडा आहे. अतिशय चपळ, अवखळ पण आनंददायक आणि आवश्यक अशी ती नैतिक गोष्ट आहे.सोप्या शब्दात मैत्री म्हणजे या पृथ्वीवरचे अमृत आहे ! ज्याची चव केवळ प्राचीन देव देवतांच मिळू शकते असे उत्तम दर्जाचे अन्न आहे ! ती आपल्या आकलन शक्तीतून आलेली स्वरुपाने उदात्त व भव्य संकल्पना आहे.ती व्यवहारात उतरली पाहिजे आणि जेंव्हा दोन्ही व्यक्तींकडून सारख्याच मित्रभावनेची देवाणघेवाण होते तेंव्हाच ती वास्तवात येते. उत्तम मित्र ही दुर्मिळ संपत्ती आहे.

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



आता मित्र करुन आपण आपले व जगाचे कितपत चांगले करतो ? माणूस सगळे जग काही आपल्या सदिच्छेने भारुन टाकू शकत नाही.ती आपली मर्यादा आहे.तो कुटुंब ,मित्रमंडळ अशा छोट्या समूहात जगतो.त्यांच्यात तो मन खुले करु शकतो.मैत्री अनेक प्रकारच्या बंधनामधून आणि अविश्वासाच्या वातावरणातून व्यक्तीला मुक्त करणारा एक उदात्त मार्ग आहे. आपल्या मित्राकडे आपण मुक्त होऊ शकतो. आणि नको असलेल्या व्यक्तींपासून स्वत:चे संरक्षण करु शकतो आणि हे सगळे या पृथ्वीवरच घडते. त्यामळे मैत्री ही काही स्वर्गाधिष्ठीत नाही, ती या भूलोकी घडणारी गोष्ट आहे.

याचा अर्थ असा की स्वर्ग व स्वर्गातील वस्तू जशा सर्वांना उपलब्ध होणाऱ्या म्हणून सार्वत्रिक स्वरुपाच्या असतात.तशी मैत्री ही सार्वत्रिक नाही तर ती खाजगी बाब आहे. काही विशिष्ट लोकांशी असलेले ते एक सौहार्दपूर्ण नाते आहे. माणूस जसजसा सुसंस्कृत होत जाईल तस-तसा खासगी मैत्री टाकून देईल.त्याच्या मित्रांची संख्या वाढेल आणि तो सार्वजनिक मैत्रीचा धनी होईल.आणि सगळे जग मैत्रीमय होऊन जाईल. कदाचित गौतम बुध्दाला अपेक्षित असलेली मित्र भावना (मेत्ता भाव ) या जगात नांदून राहील.

## कामसंबंध आणि मैत्री

आता,इथे आपण प्रणयाराधन आणि मैत्री या संबंधात फारसे न पडता त्यातून उद्बभवणाऱ्या वेगळ्या पैलूकडे वळू.तो म्हणजे या प्रणयाराधनेशी जोडले गेलेली कामसंबंधातील बंधनावस्था.(बांधिलकी नव्हे.) कामसंबंधाचे नाते हे कोणत्याही दोन व्यक्तिंमधील सर्व बंधनांपैकी प्रगाढ बंधन मानले जाते.स्वत:ला मोकळे करण्यातील ती अंतिम अवस्था आहे, ते आत्मप्रकटीकरणाचे शेवटचे टोक आहे, असेही साधारणत: समजले जाते. पण हे खरेच खरे आहे का ? (उदाहरणार्थ “ आता माझ्याकडे तुला देण्यासारखे काहीच उरले नाही !”, असे म्हणून जे काही दिले-घेतले जाते ते देवून संपले की आत्मप्रकटीकरण संपते का ? देण्यासारखे काहीच उरत नाही, असे घडते का? स्वत:चे असे मूल्यमापन करणे आक्षेपार्ह आहे की नाही?) कारण जो माणूस आपल्याला नीट जाणतो तो कामसंबंधातील आपला सहयोगी असलाच पाहिजे, असे नाही.खरे तर जो आपल्याला खऱ्या अर्थाने जाणतो / मित्र असतो अशाच माणसाशी आपला दर्जेदार व अर्थपूर्ण कामसंबंध घडू शकतो.कारण कामसंबंध प्रस्थापित करण्यात एक प्रकारचा प्रगाढ विश्वास आणि त्या व्यक्तिची संपूर्ण स्वीकारार्हता सामावलेली असते.

“यथार्थ रीतीने जोडीदाराने मनमुक्त होण्यासाठी जणू आपल्या आत्म्यात डोकावणारी खिडकी व्हावी” , असे वाटावे, अशा दर्जाचा कामसंबंध असणे योग्य असते. निर्वेध आत्मप्रकटीकरण हे परस्परांमधील विश्वासाच्या गंभीर पायावरच उभी असते. सामाजिक आंतरक्रियेचा कोणताही प्रकार विश्वासाच्या या पातळीशी इतका कधीच जोडला गेलेला नसतो.माणूस जी बंधने स्वीकारतो त्यातील कामबंधनातच असा विश्वास आढळतो.अशा सघन मैत्रीपूर्ण कामसंबंधासारखे सर्वात समृध्द बंधन दुसरे कोणतेही कदाचित नसावे.हा संबंध काही समानांमधील दुवा ठरतो.पण मुक्तीच्या वाटेवरील अनिवार्य अट बनत नाही. मानवी प्रेम ही मूलत: सदिच्छा ,आत्मीयता,इतरांच्या सुखात भर टाकणे आणि त्यांच्या सुखात आनंद मानणे, या स्वरुपाचे असते.पण एखादी व्यक्ति जेंव्हा कामुकतेसाठीच प्रेम करते तेंव्हा या साऱ्या बाबी नाहीशा होतात आणि माणूस पशुपातळीवर उतरतो.ही कामुकता केवळ कामवासनाच बनते,ती केवळ भूक बनते. कामुकप्रेम दुसऱ्या व्यक्तिला कायमच आपली भूक भागविणारी वस्तू म्हणूनच पाहते.

‘कामुकतेसाठीच काम’ हे उद्दिष्ट मानवी स्वरुपाचे अध:पतन करते, त्यात सर्वच नैतिक धारणांचा संकोच होतो.कारण भूक भागविणारी कोणतीही वस्तू भुकेल्यासाठी ‘ केवळ एक उपभोग्य वस्तू ’ असते.‘ भूक ’

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे

ही एकमेव अशी गोष्ट आहे की तिच्यासाठी प्रत्येक माणूस इतर साऱ्यांना आपल्या इच्छापूर्तीची ,मनरंजनाची वस्तू बनवित असतो.त्यात कामवासनेची भूक सर्वात अग्रभागी असते.त्यामुळेच तर आपल्याला तिची कायमच लाज वाटत असते.खुल्या मनाने मोकळ्या वातावरणात करण्यासारखी ती नसून बंद अंधाऱ्या खोलीत करण्यासारखी ती कृती वाटते.मग बेडरुम असो वा पंचतारांकित खोली असो व वेश्येची बारक्या खोलीतील बाज असो.अंधार असतोच ! खराखुरा उजेड असलाच चुकून तरी नैतिक अंधार दाटतोच.मग त्यात लपवाछपवी येते.कामोपभोगात चोरी आली की ती चोरीसारखीच आणि चोरासारखी लपूनछपून करावी लागते.साहजिकच ती लाजिरवाणी व अनैतिक वाटते.हे केवळ पुरुषालाच वाटत असे नाही तर स्त्रीला सुध्दा वाटत असते. कोणत्याही मार्गाने आपली कामेच्छा पूर्ण करणे, हे मानवीयतेचा अवमान करण्याचेच तत्त्व असते.यात कामुक व्यक्ति दुसऱ्याचा कामोपभोग घेते ती केवळ त्याच व्यक्तिबरोबरच काम हवा आहे म्हणून नव्हे तर 'कुणाबरोबरही ' काम चालेल,पण केवळ ते 'इंद्रीय' हवे असते म्हणून .त्यामुळेच तर एखादा पुरुष जेंव्हा वेश्येकडे जातो ते कोणतीतरी विशिष्ट वेश्या हवी आहे म्हणून नाही तर कोणतीही वेश्या चालेल यासाठीच.त्याचा हेतू केवळ 'लैंगिक इंद्रीय' मिळविणे एवढाच असतो. 'कामेच्छापूर्तीसाठी काम' असा हेतू असल्याने समोरील व्यक्तिचा वापर केवळ भूक भागविणारी वस्तू म्हणूनच होतो. अशा तऱ्हेची कामेच्छा पूर्ण करुन एका अर्थाने त्या कामेच्छेचाच अपमान केला जात असतो.

आणि केवळ माणूसच असे करु शकतो.कारण तो आत्मजाणीव असलेला , *आपण काय करीत आहोत याची पूर्ण जाणीव असलेला* प्राणी आहे.अशी माणसे मानवतेला त्यांच्या वासना आणि कल पूर्ण करण्याचे साधन म्हणून वेठीला धरतात.कामुकतेत ते जास्त सूक्ष्मतेने पण निश्चिततेने घडते.त्यामुळे माणूस प्राण्याच्या पातळीला येण्याची शक्यता जास्त असते.

**मुक्तिचा मार्ग**

या सगळ्यातून सुटण्यासाठी एकच मार्ग आहे तो म्हणजे आपल्या कामेच्छेचा उपयोग,संबंधित व्यक्तिवर 'एक समग्र व्यक्ति' म्हणून आपला हक्क प्रस्थापित झाल्यानंतर करणे.म्हणजे नेमके काय ? समग्र व्यक्तित्वात त्या व्यक्तिचे कल्याण आणि आनंद आणि त्या व्यक्तिची एकूणच सारी परिस्थिती यांचा समावेश होतो. त्यावर मी हक्क प्रस्थापित केला पाहिजे.म्हणजे "त्या व्यक्तिचे कल्याण आणि आनंद; ते माझे कल्याण आणि माझा आनंद" असे मी मानले पाहिजे. इथून प्रेम सुरु होते. कामेच्छापूर्तीच्या विद्यमान कृतीत केवळ त्या व्यक्तिच्या लैंगिक अवयवावरच आपला हक्क असतो.

हे जरा समजावून घेतले पाहिजे.मी जर दुसऱ्याच्या सर्वांगावर माझा हक्क प्रस्थापित केला तर त्यात तो लैंगिक अवयव येतोच.आणि मग मी माझ्या कामपूर्तीसाठी त्या अवयवाचा उपयोग करु शकतो.पण मग मी दुसऱ्याच्या सर्वांगावर 'एक समग्र व्यक्ति' म्हणून हक्क प्रस्थापित करु कसा शकतो ? म्हणून तर त्या व्यक्तिलाही मी माझ्यावर ' एक समग्र व्यक्ति' म्हणूनच हक्क प्रस्थापित करु दिला पाहिजे.

लग्नात नेमके हेच तर घडते.लग्न हा दोन व्यक्तिना परस्परानुवर्ती हक्क देण्याचा एक करार असतो.प्रत्येक जण दुसऱ्याला असा संपूर्ण हक्क देण्यासाठीच एकत्र येत असतो. मानवतेचा अवमान आणि नैतिक नियमांचे उल्लंघन न होता कामव्यवहार कसा शक्य होईल ? एखादी व्यक्ती एखाद्यास समर्पित होत असेल तर ती त्या व्यक्तिच्या केवळ कामोपयोगासाठी जवळ जाते असे नव्हे तर 'एक समग्र व्यक्ती ' म्हणूनच ती तिच्या जवळ जाते.ते दोघे वेगळे होवू शकत नाहीत.अशा रीतीने एखाद्याने स्वत:लाच शरण जावून स्वत:वर विजय मिळविला , चांगल्यावाईटासाठी आपले शरीर आणि आत्मा तसेच इतर बाबीही शरणागत वृत्तीने

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



स्वीकारल्या तर मी त्या दुसऱ्याने माझ्यावर हक्क प्रस्थापित करावा यासाठी उपलब्ध केल्या आणि दुसऱ्याने मात्र त्याची परतफेड म्हणून काहीच केले नाही तर हा व्यवहार एकतर्फीच राहिल.पण मी मला स्वत:ला दुसऱ्याकडे शरण गेलो आणि त्या व्यक्तिला मी प्राप्त केले तर मी स्वत:लाच जिंकल्यासारखे आहे.इतरांची मालमत्ता होण्यापासून मी स्वत:चा बचाव केला आहे पण इतरांना मात्र मी माझी मालमत्ता समजत आहे आणि ज्यांची मी मालमत्ता बनत आहे त्यांना जिंकून मी माझ्यावरच विजय मिळवित आहे, असे होईल. तसे न घडता समान भावना व आदर असेल एकमेकांवर प्रेममय हक्क असेल तर आणि तरच दोन व्यक्ति एक होवू शकतात.जे काही चांगलं किंवा वाईट ,आनंद आणि दु:ख ज्या कुणावरही कोसळेल ते त्याच्या एकट्यावर नसून दोघांवर असेल , दोघेही सहानुभावी असतील.कामुकता या तऱ्हेने माणसांना एकत्र आणते आणि त्या एकत्रिकरणातच कामव्यवहार शक्य होवू शकतो.

## नवरा बायकोतील मैत्री

भारतीय समाजात तर मैत्री ही संकल्पनाच फारशी मान्य नाही. स्त्री-पुरुषांचा संबंध केवळ वर्ण,जाती आणि रक्ताचाच संबंध असतो असे समजले जाते.किंवा मग तिला थेट गूढतावादी , अध्यात्मिक रुप दिले जावून ती इतकी भव्य बनविली जाते की मानवी आकलनाच्या,व्यवहाराच्याच पलिकडेच जाते.जशी दुर्योधनकर्णाची, कृष्णअर्जुन - सुदाम्याची मैत्री. प्रभू श्रीरामाला जीवलग भाऊ होते,भक्त तर दिवसागणिक वाढत आहेत.पण एकही मित्र नव्हता.त्याची सुग्रीव,बिभीषणाची मैत्रीसुध्दा श्रेणीबध्दच होती.सीता ही तर थेट भयंकर पतिव्रता आज्ञाधारक पत्नी होती .सखा हा पर्यायी शब्दही मानवी आकलनाबाहेरच राहिला.त्यामुळे नवरा - बायकोतील मैत्रीचे कोणतेही प्रतिमान परंपरेत उपलब्ध नाही.

पाश्चात्यांनी मैत्रीची संकल्पना धर्मनिरपेक्षरित्या अभ्यासली.एक सामाजिक स्वरुपाचा नैतिक संबंध म्हणून तिच्याकडे पाहिले.भारतीयांनी मात्र मैत्रीवर अध्यात्मिकतेची जबरदस्तीच केली. स्त्रीपुरुष संबंधातील वेदान्त दर्शनातील माया व ब्रह्म,शैववादातील शिवशक्ती ,सांख्य दर्शनातील प्रकृती व पुरुष,अलिकडील विठ्ठलरखुमाई ही प्रतिमाने सुध्दा नेमके स्वरुप सांगणारी आहेत की फसलेली उदाहरणे आहेत ते ठरविणे कठिण आहे.समतेच्या बाबतील ही प्रतिमाने तपासून घेतली पाहिजेत.

स्त्रीपुरुषांचा मैत्रीकरीता येणारा संबंध जर भारतीय संदर्भात लग्नसंस्थेमार्फतच येणार असेल तर पुरुष प्रधान रचनेतील सर्व दोष वगळून नव्या मूल्यरचनेवर लग्न संस्था उभी करता येईल. तिची मूल्यव्यवस्था मुख्त: समता,आत्मीयता, बांधिलकी, सार्वभौमता, व्यक्ति म्हणून प्रतिष्ठा,स्वायत्ता, परस्पर सहानुभाव, मित्र निवडण्यातील उत्कटता आणि कोणत्याही अंतस्थ हेतूचा पूर्णपणे अभाव अशी रचता येईल.

मैत्रीच्या वरील अटी लग्नात पूर्ण होतील,मैत्रीच्या प्क्रारातील तिन्ही प्रकारात लग्न संस्था बसू शकते,मैत्रीचे सारे घटक त्यात सामावलेले असतात.पतीपत्नी खऱ्या अर्थाने 'सन्मित्र' होवू शकतात.हे सारे सद्गुण नव्या लग्नबंधनात स्वीकारले गेले; कामसंबंध आणि मैत्रीचे बहुस्तरिय आकलन करता आले कामसंबंधाचा दर्जा उंचावेल.हा प्रकल्प अमलात आणला तर लग्नाची चौकटही स्वीकारण्याची गरज भासणार नाही.केवळ सहजीवन हा मैत्रीचा आकार उदारमतवादी दृष्टिकोनातून स्वागतार्ह राहिल.असलेल्या , होणाऱ्या अपत्यांची जबाबदारी ही नैतिक आणि कायदेशीररित्या आहेच, हे गृहीततत्त्व राहील.एवढेच काय, आणखी पुढे जावून समलिंगी, उभयलिंगी संबंध,त्यांची लग्ने सुध्दा मान्य करता येतील. क्रांती आणि परिवर्तन यात आपण परिवर्तनवादी भूमिका घेण्यास हरकत नसावी. तीतून कदाचित वेश्याव्यवसायावरही मार्ग निघेल.

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष उवाच" , २००७ दिवाळी अंक, संपादक : गिताली वि.म. , मुकुंद किर्दत,, पुणे



## मैत्री आणि प्रेम

प्रेमीजनांसाठी एकमेकांना पाहणे हाच एक मोठा आनंदाचा आाणि प्रेमाचा विषय असतो. एकमेकांना पाहण्यातूनच, सतत भेटण्यातूनच त्यांच्या प्रेमाचे अस्तित्व व त्याचा उगम टिकते.हाच नियम मैत्रीलाही लागू करता येईल.मैत्रीचा दर्जा हा प्रेमाचाच दर्जा असतो. मैत्री हे प्रेमचं असते.सहजीवन व सहानुभवन यांनीच मैत्री व मैत्रीतील प्रेम टिकून राहते.माणसाचा स्वभाव लक्षात घेता माणूस प्रेमाची वाटणी कशी करतो ? तर प्रेमाची सर्वोच्च देवाणघेवाण ही मैत्रीत व्यक्त होते आणि मैत्री ही प्रेमाचे देवाणघेवाण मोजण्याचे एक कळीचे साधन आहे.ते कसे ? तर मला अपेक्षित असलेले प्रेम मला तेव्हाच मिळू शकते जेव्हा मी इतरांवर प्रेम करेन.इतरांना मी जे देईन तेच मला परत मिळेल.पण मी तर माझ्याइतके अन्य कोणावरही जास्त प्रेम करुच शकत नाही.आता मी माझ्यावर केंव्हा प्रेम करतो ? जेव्हा मला अशी खात्री पटेल की इतरजण माझ्यावर ( ते स्वत:वर करतील तसे ) प्रेम करीत आहेत ! त्याचवेळी मी सुध्दा (माझ्यावर प्रेम करतो तसे ) त्यांच्यावर प्रेम करेन, तेंव्हा आणि तेंव्हाच माझे प्रेम मला परत मिळेल.अशा रीतीने मैत्री हे प्रेम मोजण्याचे मोजमाप आहे आणि मैत्री कितपत दोषी आहे हे पाहण्याचेही साधन आहे !

प्रेमिकांसाठी ‘नवरा-बायको’ हा प्रचलित शब्द म्हणून वापरु.नवरा-बायको म्हणजे लग्नसंस्था. लग्न ही खासगी हेतूसाठी होणारी सार्वजनिक स्वरुपाची घटना आहे. हेतू सर्वांना समान असतो.म्हणून साध्यही समान बनते. साहजिकच साधनाही समान होते.लग्न ही मैत्रीच आहे.पण त्यातील मैत्री ऐच्छिक असते.लग्न हा धार्मिक व कायदेशीर करार असतो.कायदा नीतीला पाठबळ देतो.म्हणून लग्न सुध्दा नैतिक घटना ठरते.भारतीय समाजात तरी लग्न हीच एकमेव नैतिक गोष्ट बनली आहे, हे अधोरेखित झाले पाहिजे.(उदाहरणार्थ अनैतिक संबंधातून खून म्हणजे या भानगडीतून हत्या .) अर्थात त्यात धर्म,वर्ण,जाती आणि आर्थिक,सामाजिक,राजकीय,शैक्षणिक इत्यादी प्रकारचे अनेक उपघटक नीतीचे मानदंड ठरवित असतात.

## आईवडिल व मुले यांची मैत्री

कामसंबंध वगळता साऱ्या जगाशी जर चांगली मैत्री होवू शकत असेल तर आपल्या मुलांशी मैत्री करण्यास आईवडिलांना हरकत नसावी.विशेषत: तरुण मुलगेमुली आईवडिलांची ओळख ‘माय बेस्ट फ्रेंड’ अशी इतर मित्रांना करुन देतात.तेंव्हा त्यांना वर स्पष्ट केलेली अपेक्षाच असते.या नात्यात अनेक धोके ही असतात आणि विषमता तर असतेच. ती विसरुन निखळ मैत्री शक्य आहे.अर्थात हा अन्य लेखाचा विषय आहे.

-----------------------------------------------